॥ आजचा सुविचार ॥

सामान्य दिसणारे लोकच
जगात सर्वात चांगले लोक असतात.
म्हणूनच देव अश्या
लोकांनाच जास्ती निर्माण करतो.

दैनिक **अक्षराज**
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०६ | अंक : ५७, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.१० ऑक्टोबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# रेल्वेचा मोठा निर्णय; नवी दिल्लीत जाणाऱ्या सर्व गाड्या रद्द

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, मुंबई :** कॉक्रोच जनता पार्टीने उद्या १० ऑक्टोबर रोजी नवी दिल्लीतील जंतर मंतर इथं निवडणूक आयोगाच्या कारभाराविरोधात आंदोलनाची हाक दिल्यानंतर आता रेल्वेकडून मोठा निर्णय घेण्यात आला आहे. देशभरातून नवी दिल्ली आणि हजरत निजामुद्दीन या स्थानकांवर १० ऑक्टोबर रोजी पहाटे ४ ते दुपारी २ या कालावधीत पोहोचणाऱ्या सर्व गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. या दोन्ही स्थानकांच्या परिसरात होणाऱ्या संभाव्य वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आल्याचं रेल्वेकडून स्पष्ट करण्यात आलं आहे.



रेल्वे प्रशासनाच्या या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर आज मुंबईहून दिल्लीला जाणारी राजधानी एक्स्प्रेस ही गाडीही रद्द करण्यात आली आहे. रेल्वेकडून एक पत्रक काढत याबाबतच्या निर्णयाची माहिती देण्यात आली. ऐनवेळी गाडी रद्द करण्यात आल्याने शेकडो प्रवाशांना नाहक मनस्ताप सहन करावा लागणार आहे. अनेक प्रवासी कामानिमित्त तसेच पर्यटनाच्या हेतूने दिल्लीला जात असतात. मुंबई किंवा अन्य शहरांतून नवी दिल्ली इथं जाऊन पुढे मग इतर पर्यटनस्थळी जाण्याचा अनेक पर्यटकांचा प्लॅन असतो. मात्र रेल्वेकडून अचानक गाड्या रद्द करण्यात आल्याने प्रवाशांमध्ये संतापाची भावना आहे.

दरम्यान, रेल्वे गाड्यांसह दिल्लीतील मेट्रो सेवाही उद्या बंद ठेवण्यात येणार आहे. प्रशासनाच्या या निर्णयाविरोधात आता ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल आणि अभिषेक मनु सिंघवी यांनी सुप्रीम कोर्टात धाव घेतली असून कोर्टात याप्रकरणी सुनावणी सुरू आहे.

**कॉक्रोच जनता पार्टीकडून आंदोलनाची घोषणा**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुम ार यांच्याविरोधात शनिवारी, १० ऑक्टोबरला होणाऱ्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कॉक्रोच जनता पार्टीने (सीजेपी) आणि विविध विद्यार्थी संघटनांनी बुधवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेतून संयुक्त लढ्याचे आवाहन केलेलं आहे. निवडणूक व्यवस्थेत आमूलाग्र सुधारणा होईपर्यंत आंदोलन सुरू राहील, असा इशारा त्यांनी दिला. संयुक्त पत्रकार परिषदेत 'सीजेपी'सह ऑल इंडिया स्टुडंट्स असोसिएशन (एआयएसए), ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन (एआयएसएफ), स्टुडंट्स फ ेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय) आणि 'आप'ची विद्यार्थी शाखा 'असोसिएशन ऑफ स्टुडंट्स फॉर अल्टरनेटिव्ह पॉलिटिक्स' (एएसएपी) या विद्यार्थी संघटना सहभागी झाल्या होत्या.

'सीजेपी'चा सहसंयोजक सौरव दास यांनी देशभरातील नागरिकांना दिल्लीला येण्याचे आवाहन केले. 'हा लढा सोपा नाही. रेल्वे आणि विम ानाची तिकिटे काढून सर्वांनी सहभागी व्हावे,' असे ते म्हणाले. 'ज्ञानेशकुमार यांनी राजीनामा दिला, तरी आंदोलन मागे घेतले जाणार नाही, कारण संपूर्ण निवडणूक व्यवस्था स्वच्छ करण्याची गरज आहे,' असे दास यांनी सांगितले यावेळी सांगितले होते.

'सीजेपी'च्या मागण्यांमध्ये कुमार यांचा राजीनामा, त्यांच्यावर फौजदारी कारवाई, 'एसआयआर'ला स्थगिती, आगामी निवडणुका थांबवणे, जानेवारी २०२५ची मतदारयादी पुनर्स्थापित करणे, स्वतंत्र चौकशी आणि निवडणूक आयोगातील नियुक्त्यांवरील २०२३चा कायदा रद्द करणे यांचा समावेश आहे.

आंदोलनासाठी संसद मार्ग पोलिस ठाण्यात औपचारिक सूचना देण्यात आली आहे. 'परवानगी हा शब्द वापरू नका. दिल्ली पोलिस आम्हाला परवानगी देणारे कोण?,' असा प्रश्न दास यांनी उपस्थित केला. दरम्यान, 'विद्यार्थी आंदोलन आणि विरोधी पक्षांचे आंदोलन यात कोणतीही फूट नाही. भाजपच्या बाजूने असलेल्यांनी लोकशाही वाचवण्यासाठी आता जनतेच्या बाजूने उभे राहावे,' असे आवाहन 'एआयएसए'ची अध्यक्ष नेहा बोरा हिने केले.

**दिल्लीआधी बेंगळुरूत झालं आंदोलन...**

नवी दिल्लीतील जंतर मंतर इथं शनिवारी होणाऱ्या आंदोलनाच्या आधी काल गुरुवारी कॉक्रोच जनता पार्टीकडून बेंगळुरू इथं आंदोलन करण्यात आलं. ''एसआयआर' अंतर्गत मतदारांची नावे वगळण्याची प्रक्रिया भाजपविरोधी मतदारांना मतदानापासून वंचित ठेवण्यासाठीच राबवली जात आहे,' असा आरोप कॉक्रोच जनता पार्टीचे (सीजेपी) संस्थापक अभिजित दीपके यांनी यावेळी केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि निवडणूक आयोग लोकशाहीला कमकुवत करीत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

बेंगळुरूमध्ये विविध नागरी संघटनांनी आयोजित केलेल्या 'पीपल्स ट्रिब्युनल'मध्ये ते बोलत होते. या कार्यक्रमाला यूट्यूबर ध्रुव राठी आणि अभिनेता प्रकाश राज उपस्थित होते. दीपके म्हणाले, की मतदारयादीतून मृत घोषित करून नावे वगळण्यात आलेले अनेक नागरिक प्रत्यक्षात जिवंत असून, ते कार्यक्रमाला उपस्थित होते. 'निवडणूक आयोगातील अधिकाऱ्यांनी, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्यासह मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या कथित निर्देशांवर मतदारांची नावे वगळली,' असा आरोप दीपके यांनी केला. 'रा. स्व. संघाची विचारधारा आंबेडकर आणि पेरियार यांच्या तत्त्वांना मानत नाही,' असेही ते म्हणाले. २०२४च्या लोकसभा निवडणुकीचा संदर्भ देऊन दीपके म्हणाले, की भाजपला अपेक्षित बहुमत न मिळाल्यानंतर विरोधी मतदारांची नावे वगळण्याचा प्रयत्न सुरू झाला.

---

# प्रताप सरनाईक फाउंडेशन व जीएम नवरात्री महोत्सव २०२६

## गरबाप्रेमींसाठी मोफत प्रवेश आणि दुष्काळग्रस्त बळीराजाला मदतीचा हात!

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०९, मिरा-भाईंदर :** मिरा-भाईंदर शहरात दरवर्षी अत्यंत उत्साहात साजरा होणारा आणि हजारो गरबाप्रेमींचे आकर्षण असलेला 'नवरात्री महोत्सव २०२६' यंदा अधिक भव्य आणि सामाजिक भान जपणारा ठरणार आहे. 'प्रताप सरनाईक फाउंडेशन' आणि 'जीएम' यांच्या संयुक्त विद्यम ाने आयोजित हा बहुप्रतीक्षित उत्सव येत्या ११ ऑक्टोबर २०२६ ते १९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत मिरा रोड येथील बेवर्ली पार्क स्थित नामदार गोखले मैदानावर मोठ्या थाटामाटात रंगणार आहे. या संपूर्ण महोत्सवाचे आयोजन, सुरक्षा व्यवस्था, नियोजन आणि प्रत्यक्ष मैदानातील तयारीचा सर्वंकष आढावा घेण्यासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्हा पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी प्रत्यक्ष मैदानावर जाऊन पाहणी केली. या पाहणीनंतर आयोजित करण्यात आलेल्या विशेष पत्रकार परिषदेत त्यांनी या महोत्सवाची वैशिष्ट्ये विशद केली. पत्रकारांशी संवाद साधताना मंत्री सरनाईक यांनी महोत्सवामागील भूमिका आणि सामाजिक दायित्वाची संकल्पना मांडली. त्यांनी स्पष्ट केले की, सध्या संपूर्ण महाराष्ट्रातील आपला शेतकरी राजा दुष्काळाच्या भीषण सावटात सापडला आहे. परंतु, अडचणीच्या काळातही आपली हिंदू संस्कृती, परंपरा आणि सण-उत्सव जपले जाणे अत्यंत आवश्यक आहे. 'मिनी भारत' अशी ओळख असलेल्या मिरा-भाईंदर शहरात विविध संस्कृतीचे नागरिक एकत्र राहतात आणि या कलेने नटलेल्या शहरात हे उत्सव तितक्याच उत्साहात साजरे झाले पाहिजेत. नागरिकांवर



कुठलाही आर्थिक भार न पडता सर्वांना या उत्सवाचा निवांत आनंद घेता यावा, यासाठी संपूर्ण गरबा व दांडिया पूर्णपणे मोफत ठेवण्यात आला आहे. नागरिकांच्या सोयीसाठी आणि गर्दीचे नियोजन योग्य प्रकारे व्हावे यासाठी आधुनिक क्यूआर कोड (QR Code) प्रणालीद्वारे मोफत पास उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

**उत्सवाच्या माध्यमातून बळीराजाला कोट्यावधींची मदत**

यंदाचा हा उत्सव केवळ गाणी आणि गरब्यापुरता मर्यादित न ठेवता, त्याद्वारे दुष्काळग्रस्त बळीराजाला थेट मदत करण्याचा एक अनोखा संकल्प करण्यात आला आहे. उत्सव मंडपात 'मुख्यमंत्री सहायता निधी'चा एक स्वतंत्र आणि विशेष स्टॉल उभारण्यात येणार आहे, ज्या माध्यमातून नागरिक अन्नधान्य, वैद्यकीय किट आणि इतर आवश्यक वस्तूंच्या स्वरूपात थेट शेतकऱ्यांपर्यंत आपली मदत पोहोचवू शकतील. याशिवाय, स्वतः मंत्री प्रताप सरनाईक यांनी वैयक्तिक पातळीवर सामाजिक बांधिलकी जपत आपल्या 'विहंग ग्रुप ऑफ कंपनीज'च्या वतीने दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांसाठी आणि शेतकऱ्यांसाठी तब्बल ८ ते १० कोटी रुपयांचा मदतनिधी देणार असल्याची मोठी आणि महत्वपूर्ण घोषणा केली.

**मैदानाच्या मुद्द्यावरून मंत्री सरनाईक आक्रमक, हिंदूच्या सणात अडथळे का?**

या पत्रकार परिषदेत नवरात्रोत्सवाच्या मैदानावरून निम ाण झालेल्या वादावर बोलताना मंत्री सरनाईक यांनी अत्यंत आक्रमक भूमिका घेत स्थानिक महापालिका सत्ताधाऱ्यांवर व प्रशासनावर जोरदार निशाणा साधला. पद्मभूषण मेजर ध्यानचंद मैदान नवरात्रोत्सवासाठी उपलब्ध करून न दिल्याने त्यांनी पालिका प्रशासनाच्या दुटप्पी धोरणावर घणाघाती टीका केली. महासभेच्या ठरावाच्या एक दिवस आधीच या मैदानाचे अधिकृत बुकिंग करण्यात आले होते, असा थेट दावा करत आम्ही महापालिकेचे कोणतेही मैदान फुकट मागत नसून रीतसर भाडे भरून घेतो, मग असे असताना केवळ हिंदूंच्याच सणांच्या वेळी अशा प्रकारे अडथळे का निर्माण केले जातात, असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला. कोणत्याही राजकीय पक्षाच्या किंवा विरोधी गटाच्या कार्यक्रमांना परवानगी देताना प्रशासनाने कसलाही भेदभाव न करता सर्वांना समान नियमाने वागणूक दिली पाहिजे.

संस्कृती, आनंद आणि सामाजिक दायित्वाचा हा त्रिवेणी संगम असलेल्या नवरात्री महोत्सवात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी जनतेला केले आहे.

---

# अखेर अनधिकृत देशी दारू दुकानावर फिरला बुलडोजर

## ग्रामस्थांचा संताप उफाळला, फटाके फोडून जल्लोष!

**अक्षराज : दिवाकर घेर**



**दि.०९, नागपूर :** राष्ट्रीय म हामार्गाच्या जागेवर गेल्या अनेक वर्षांपासून ठाण मांडून बसलेल्या अनधिकृत देशी दारूच्या दुकानावर अखेर संतप्त ग्रामस्थांनी बुलडोजर फिरवून जमीनदोस्त केले. प्रशासकीय आदेशाची वाट न पाहता संतप्त जमावाने गुरुवारी सकाळी कारवाईचा बडगा उचलल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. अनधिकृत देशी दारूचे दुकान जमीनदोस्त होताच शेकडो महिला व नागरिकांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले, शिवाय फटाक्यांची जोरदार आतषबाजी करत जल्लोष साजरा केला.

अनधिकृत दारू दुकानासह इतर मूलभूत सुविधांच्या स्थानिक मागण्यांसाठी माजी उपसभापती राहुल तिवारी यांनी महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून २ ऑक्टोबर पासून बेमुदत उपोषण सुरू केले होते. तिवारी यांच्या आंदोलनाचा वाढता दबाव पाहून चनकापूर ग्रामपंचायत प्रशासनाने अन्नामोड परिसरातील राष्ट्रीय महामार्गाच्या जागेवरील अनधिकृत देशी दारू दुकानाचे अतिक्रमण ८ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता रिकामे करण्याचा निर्णय जाहीर केला होता.

दरम्यान, ७ ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने राष्ट्रीय महामार्ग २४४ दहेगाव (रंगारी) खापरखेडा-कामठी परिसरातील सर्व अतिक्रमण काढण्याबाबत नोटिसा अतिक्रमण धारकांना जारी केल्या तर दुसरीकडे देशी दारू दुकान संचालकाने चनकापूर ग्रामपंचायत प्रशासनाला कायदेशीर नोटीस दिली त्यामूळे ग्रामपंचायत प्रशासन वरिष्ठांचे मार्गदर्शन घेत होते. अतिक्रमण कारवाईसाठी दोन जेसीबी व ट्रॅक्टर घटनास्थळी तैनात आले होते. मात्र, चनकापूर ग्रामपंचायत प्रशासनाकडून कारवाईचे आदेश दिले नव्हते.

गुरुवारला सकाळ पासूनच अन्नामोड अनधिकृत देशी दारू दुकान परिसरात शेकडो नागरिक व महिलांची गर्दी जमली होती. यावेळी संतप्त ग्रामस्थांनी दोन जेसीबीच्या साहाय्याने दारूचे दुकान जमीनदोस्त केले त्यामूळे काही काळ तणाव निर्माण झाला होता.

**५ लाखांचे नुकसान झाल्याचा आरोप!**

अतिक्रमण कारवाई दरम्यान देशी दारूच्या गल्ल्यातील १५ हजार रुपये रोख गायब झाले शिवाय ५ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा आरोप देशी दारू दुकान संचालकाने केला.

● यासंदर्भात ग्रामपंचायत अधिकारी पंकज दांगट यांच्याशी संपर्क साधला असता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व देशी दारू दुकानदाराच्या कायदेशीर नोटिस प्राप्त झाले होते. त्यामूळे वरिष्ठांचे मार्गदर्शन घेत होतो. यादरम्यान बुलडोजरने केव्हा अतिक्रमण कारवाई झाली याबाबत मला कल्पना नसल्याचे प्रस्तुत प्रतिनिधीला सांगितले.

**राहुल तिवारींची प्रकृती खालावली उपोषण तूर्तास स्थगित!**

आंदोलनाच्या सातव्या दिवशी ८ ऑक्टोबर गुरुवारला दुपारच्या सुमारास माजी उपसभापती राहुल तिवारी यांची प्रकृती अचानक खालावली त्यांना दहेगाव (रंगारी) येथील न्यू लाईफ रुग्णालयात दाखल करण्यात आले. यावेळी माजी मंत्री सुनील केदार यांनी रुग्णालयात जाऊन तिवारी यांची भेट घेतली. यावेळी नारळ पाणी देऊन तिवारी यांनी आपले उपोषण तूर्तास स्थगित केले. याप्रसंगी वीज केंद्राचे मुख्य अभियंता भूषण शिंदे राहुल तिवारी यांच्या मागण्यांवर तोडगा काढण्याचे आश्वासन दिले मात्र वेकोली प्रशासनाने याबाबत कोणतीही भूमिका घेतली नाही.

---

# 'अल-निनो'चे आव्हान आणि आपली जबाबदारी !

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०९, मुंबई :** हवामान बदल आणि 'अल-निनो'च्या प्रभावामुळे महाराष्ट्रातील २६५ तालुक्यांम ध्ये प्रथम कळ (ट्रिगर-१) लागू होऊन दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत जलसाठ्याचे काटकसरीने व्यवस्थापन करण्याचे निर्देश जलसंपदा विभागाने ५ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे दिले आहेत.

**पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य**

पिण्याचे पाणी, घरगुती गरजा आणि जनावरांसाठीच्या पाण्याला प्रथम प्राधान्य असेल. प्रत्येक प्रमुख जलाशयात आपत्कालीन परिस्थितीसाठी १० टक्के जिवंत साठा राखला जाईल. अत्यंत बिकट स्थितीत तांत्रिक व्यवहार्यता, पाण्याची गुणवत्ता आणि धरणाची सुरक्षितता तपासूनच मृतसाठ्यातील पाणी वापरण्याचा विचार केला जाईल.



**उद्योग आणि शेतीसाठी नियोजन**

उद्योगांना एकूण वापरापैकी किमान ३० टक्के पाण्याचा पुनर्वापर करणे बंधनकारक आहे. पिण्याच्या पाण्याऐवजी प्रक्रिया केलेले पाणी वापरण्यावर भर असेल. पिण्याच्या व औद्योगिक गरजा भागल्यानंतरच सिंचनासाठी पाणी दिले जाईल. कमी पाणी लागणाऱ्या रब्बी व चारा पिकांना प्राधान्य देऊन ठिबक आणि तुषार सिंचनाला प्रोत्साहन दिले जाईल.

**स्थानिक संस्थांना १० टक्के पाणीकपात**

महानगरपालिका, नगरपालिका आणि ग्रामपंचायतींनी १६ ऑक्टोबर २०२६ पासून पाणीपुरवठ्यात किमान १० टक्के कपात करणे अनिवार्य आहे. उद्याने, रस्त्यांवरील दुभाजक, बांधकाम आणि धुण्यासाठी प्रक्रिया केलेले सांडपाणी वापरले जाईल.

अनधिकृत पाणी उपसा रोखण्यासाठी महसूल, पोलीस आणि जलसंपदा विभागाची संयुक्त पथके गस्त घालतील. बेकायदेशीर उपशासाठी वापरलेले पंप व पाइपलाइन जप्त करून कारवाई केली जाईल. पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील समिती पाणीवाटपाचे नियोजन व संनियंत्रण करेल. या समि तीत जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जलसंपदा अधिकारी असतील.

अक्षराज



# संपादकीय

## मुलायमसिंग यादव

समाजवादी पक्षाचे संस्थापक आणि उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री तसेच देशाचे माजी संरक्षण मंत्री मुलायमसिंग यादव यांची आज पुण्यतिथी. १० ऑक्टोबर २०२२ रोजी वृद्धपकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने समाजवादी विचारांचा पाईक असलेला एक खंदा कार्यकर्ता काळाच्या पडद्याआड गेला आहे. मुलायमसिंग यादव यांच्या निधनाने समाजवादी चळवळीची मोठी हानी झाली आहे. २२ नोव्हेंबर १९३९ रोजी उत्तर प्रदेशातील सैफई गावात जन्मलेले मुलायम सिंग यांनी आग्रा विद्यापीठातून एम. ए व जैन इंटर कॉलेज करहल मधून बीटी केले. वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षीच त्यांनी राजकीय राजकीय चळवळीत भाग घेतला. १९५४ साली वयाच्या पंधराव्या वर्षी समाजवादी नेते डॉ राम मोहन लोहिया यांच्या चळवळीत भाग घेतल्याने त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. जेष्ठ समाजवादी नेते डॉ राम मनोहर लोहिया यांना ते गुरू मानत. त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊनच त्यांनी समाजवादी आंदोलनात भाग घेतला. १९६७ साली मुलायमसिंग यादव युनायटेड सोशालिस्ट पक्षाच्या तिकिटावर प्रथमच विधानसभेत निवडून गेले. १९७५ साली जेंव्हा देशात आणीबाणी घोषित झाली तेंव्हा या आणीबाणीला मुलायमसिंग यादव यांनी कडवा विरोध केला.

आणीबाणीच्या काळात मुलायमसिंग यादव यांना १९ महिन्यांचा तुरुंगवास भोगावा लागला. आणीबाणी उठल्यानंतर काँग्रेसला विरोध करण्यासाठी जो जनता परिवार तयार झाला होता त्यात मुलायमसिंग यांची भूमिका खूप महत्वाची होती. मुलायमसिंग यादव, लालूप्रसाद यादव, रामविलास पासवान, बिजू पटनाईक, चंद्रशेखर हे जनता परिवारातील त्यावेळचे तरुण तुर्क नेते होते. या नेत्यांनी मिळून पुढे जनता दल या पक्षाची स्थापना केली. १९८९ साली हा पक्ष केंद्रात सत्तेवर आला मात्र कार्यकाळ पूर्ण करण्याआधीच हे सरकार पडले. पुढे जनता दलात फूट पडली. मुलायम सिंग यादव हे ही जनता परिवारातून बाहेर पडले आणि ४ नोव्हेंबर १९९२ रोजी त्यांनी समाजवादी पक्षाची स्थापना केली. १९९६ साली जेंव्हा केंद्रात तिसऱ्या आघाडीची सत्ता आली तेंव्हा मुलायमसिंग यादव हे पंतप्रधान पदाचे प्रबळ दावेदार होते मात्र काही कारणांनी त्यांना पंतप्रधान होता आले नाही. एच डी देवेगौडा हे भारताचे पंतप्रधान बनले. या मंत्रिमंडळात ते संरक्षण मंत्री बनले. पण हे सरकारही जास्त काळ टिकले नाही त्यानंतर आय. के. गुजराल पंतप्रधान बनले त्यांच्या मंत्रिमंडळात देखील ते मंत्री बनले. याकाळात त्यांनी भाजपला प्रखर विरोध केला. त्यामुळे ते काँग्रेसच्या जवळ गेले असे मानले जात होते मात्र १९९९ साली जेंव्हा काँग्रेसने केंद्रात सत्ता स्थापनेचा प्रयत्न केला तेंव्हा मुलायम सिंग यादव यांनी त्यांना साथ दिली नाही. दरम्यानच्या काळात त्यांनी उत्तरप्रदेश मधील आपला वरचष्मा कायम ठेवला.

उत्तर प्रदेश सारख्या देशातील सर्वात मोठ्या आणि महत्वाच्या राज्याचे ते ५ डिसेंबर १९८९ ते २४ जानेवारी १९९१, ५ डिसेंबर१९९३ ते ३ जून १९९६ आणि २९ ऑगस्ट २००३ ते ११ मे २००७ या कालावधीत ते तीनदा उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री राहिले. पुढे त्यांचे सुपुत्र अखिलेश यादव हे देखील उत्तर प्रदेशचे पाच वर्षे मुख्यमंत्री राहिले. उत्तर प्रदेशच्या राजकारणातच नव्हे तर देशाच्या राजकारणात कायम मध्यवर्ती भूमिका बजावणारे मुलायमसिंग हे दिलदार राजकारणी म्हणून ओळखले जात. त्यांच्या निधनाने समाजवादी चळवळीची मोठी हानी झाली आहे. मुलायमसिंग यादव यांना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन !

**– श्याम ठाणेदार**

# क्रांतिवीर...!!

**जगाव कि मरावे, हाच एकच सवाल आहे...!!**

'नटसम्राट'मधील अप्पासाहेब बेलवलकरांच्या तोंडून निघालेला हा प्रश्न आज पुन्हा पुन्हा कानात घुमतो आहे. मात्र यावेळी रंगमंचावरचा अप्पा समोर नाही, तर पडद्यावरचे नाना पाटेकर आहेत. गोव्यातील आपल्या निवासस्थानी हृदयविकाराच्या झटक्याने वयाच्या ७५ व्या वर्षी नाना पाटेकर यांनी अखेरचा श्वास घेतला आणि भारतीय अभिनयाच्या रंगमंचावरचा एक प्रदीर्घ, विलक्षण आणि अस्वस्थ करणारा अंक संपला. ८ ऑक्टोबरच्या पहाटे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. वैद्यकीय पथकाने सुमारे ४५ मिनिटे त्यांना वाचवण्याचा प्रयत्न केला; मात्र त्यांना पुनरुज्जीवित करता आले नाही. देखणेपणा, नायकत्व, तारकांची झगमग आणि कृत्रिम भावनांच्या पलीकडे जाऊन माणसाच्या चेहऱ्यावरचं खरंखुरं आयुष्य पडद्यावर आणणारा अभिनेता आता आपल्यात नाही. विश्वनाथ पाटेकर हे त्यांचे मूळ नाव. मराठी रंगभूमीपासून सुरू झालेला त्यांचा प्रवास १९७८ मध्ये 'गमन'मधून चित्रपटापर्यंत पोहोचला. सुरुवातीचा संघर्ष अत्यंत कठीण होता. चित्रपटांची पोस्टर्स रंगवण्यापासून ते उदरनिर्वाहासाठी वेगवेगळी कामे करण्यापर्यंतचा काळ त्यांनी पाहिला. या संघर्षातून आलेली माणसांची समज त्यांच्या अभिनयात कायम राहिली. त्यामुळे नानांच्या पात्रांना कधीही कृत्रिमपणा जाणवला नाही. त्यांच्यातील राग असो, असहायता असो, हिंसा असो, विनोद असो किंवा वेदना त्यामागे एखाद्या जिवंत

माणसाचा श्वास जाणवत राहिला. 'परिंदा'ने नानांना राष्ट्रीय पातळीवर अधोरेखित केले. अण्णाच्या भूमिकेतील क्रौर्य आणि मानसिक गुंतागुंत त्यांनी अशा पद्धतीने उभी केली की खलनायक या शब्दालाच नवी छटा मिळाली. या भूमिकेसाठी त्यांना राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळाला. 'अग्निसाक्षी'साठी



पुन्हा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. 'क्रांतिवीर'मधील प्रताप नारायण तिलकसाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. म्हणजेच सहाय्यक भूमिकेपासून प्रमुख भूमिकेपर्यंत आणि गंभीर वास्तववादी व्यक्तिरेखेपासून जनमानसावर प्रभाव टाकणाऱ्या नायकापर्यंतचा त्यांचा प्रवास पुरस्कारांनीही नोंदवला. तीन राष्ट्रीय पुरस्कार मिळवणाऱ्या मोजक्या भारतीय अभिनेत्यांमध्ये त्यांचा समावेश झाला.

'क्रांतिवीर'मधील त्यांचा आक्रोश आजही भारतीय चित्रपटातील राजकीय-सामाजिक अस्वस्थतेचे प्रतीक मानला जातो. 'आ गए मेरी मौत का तमाशा देखने?' या एका वाक्यातून पडद्यावरील व्यक्तिरेखेचा संताप प्रेक्षकांच्या मनात उतरला. नानांची संवादफेक ही त्यांची स्वतंत्र ओळख होती. ते संवाद उच्चारत नसत; शब्दांच्या मागची मानसिक अवस्था शरीरात उतरवून मग ते शब्द बाहेर यायचे. त्यामुळे 'एक मच्छर साला आदमी को हिजड़ा बना देता है...' असो किंवा 'अब तक छप्पन'मधील पोलीस अधिकाऱ्याचा कोरडा आवेश नानांच्या संवादांना वेगळीच धार होती. पण या सगळ्याचा सर्वोच्च बिंदू होता 'नटसम्राट'.वि.वा.शिरवाडकरांच्या अजरामर व्यक्तिरेखेला नानांनी पडद्यावर साकारले आणि मराठी रंगभूमीच्या इतिहासातील एका कलाकाराची शोकांतिका त्यांनी आपल्या चेहऱ्यावर आणली. 'कुणी घर देता का घर ? एका तुफानाला कुणी घर देता का?' हा प्रश्न विचारताना नाना केवळ वृद्ध कलाकाराची अवस्था व्यक्त करत नव्हते; ते वृद्धत्व, एकटेपण, उपेक्षा आणि माणसाला शेवटी लागणाऱ्या मायेच्या आसऱ्याचा प्रश्न समोर ठेवत होते. 'प्रतिष्ठा म्हणजे एक भाकड ओझं...' म्हणणारा अप्पा आणि 'विधात्या, तू इतका कठोर का झालास रे?' अशी हाक देणारा अप्पा, ही दोन्ही टोकं नानांनी आपल्या अभिनयातून पकडली. त्यांच्या डोळ्यांतून संवाद संपल्यानंतरही प्रसंग सुरूच राहायचा. म्हणून 'नटसम्राट' हा त्यांच्या कारकिर्दीतील आणखी एक विलक्षण चित्रपट ठरला. किंबहुना तो नाना पाटेकर यांच्या अभिनयाचा दस्तऐवज ठरला.

विशेष म्हणजे याच अभिनेत्याने 'वेलकम' मध्ये उदय शेट्टी साकारताना प्रेक्षकांना पोट धरून हसवले. गंभीर भूमिकांमधील प्रचंड तीव्रता आणि विनोदी भूमिकेतील अचूक वेळ यांचा असा संगम फार थोड्या अभिनेत्यांकडे दिसतो. 'प्रहार'मधून त्यांनी दिग्दर्शन केले. 'अब तक छप्पन', 'राजनीती', 'अपहरण', 'खामोशी', 'वेलकम' अशा विविध चित्रपटांतून त्यांनी स्वतःला कोणत्याही एका प्रतिमेत अडकू दिले नाही. पडद्याबाहेरचा नाना आणखी वेगळा होता. प्रसिद्धीच्या केंद्रस्थानी असूनही ग्रामीण महाराष्ट्राशी त्यांचे नाते कायम राहिले. 'नाम फाऊंडेशन'च्या माध्यमातून शेतकरी आणि ग्रामीण भागातील प्रश्नांवर त्यांनी काम केले. त्यामुळे अभिनेता म्हणून मिळालेली लोकप्रियता त्यांनी सामाजिक जबाबदारीत रुपांतरित करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील हा पैलू त्यांच्या अभिनयाइतकाच महत्त्वाचा आहे. नानांच्या निधनाच्या चार दिवस आधीच ते गोव्यात एका सार्वजनिक कार्यक्रमात दिसले होते. मृत्यूबद्दल बोलताना त्यांनी माणसाला एक दिवस जावेच लागते, या वास्तवाचा उल्लेख केला होता. नियतीला कदाचित त्यांची तीच सार्वजनिक रंगमंचावरील शेवटची उपस्थिती मान्य होती. आज रंगमंच रिकामा आहे. खुर्ची तिथेच आहे. प्रकाश तिथेच आहे. पडदा खाली आला आहे.

पण कानात अजूनही अप्पांचा आवाज घुमतोय... 'जगावे की मरावे, हाच एकच सवाल आहे...' नानांनी या प्रश्नाचे उत्तर त्यांच्या संपूर्ण आयुष्याने दिले. कलेसाठी जगले, माणसांसाठी जगले आणि अखेर आपल्या कलेतच अमर झाले. आज नटसम्राटाची एक्झिट झाली आहे. पण सम्राट असलेला नट संपलेला नाही. तो आता आपल्या स्मरणात रंगमंचावर उभा राहणार आहे.पुन्हा पुन्हा.. प्रत्येक वेळी पडदा उघडला की...सर्वांच्या स्मरणार्थ राहणार क्रांतिवीर नाना हे नक्की...?

**नाना भावपूर्ण श्रद्धांजली..!!**

**ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**मासा बेलेवाडी, कागल-कोल्हापूर**
**९८६७७३२५०४**

# देवीच्या मारक रूपाची उपासना : काळाची गरज !

नवरात्र हा खरेतर मांगल्याचा आणि पावित्र्याचा उत्सव. स्त्रीशक्तीचा जागर करण्याचा उत्सव, देवीच्या पराक्रमाची उपासना करण्याचा उत्सव. महिषासुराशी नऊ दिवस युद्ध करून नवव्या रात्री देवीने महिषासुराचा वध केला. या युद्धाचे प्रतीक म्हणून टिपऱ्या म्हणजेच दांडिया खेळल्या जातात.

आजमितीला मात्र या उत्सवाला आलेले ग्लॅमरस स्वरूप उत्सवाच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जात आहे. चांगले नृत्य करता यावे म्हणून तरुणींसह तरुणही एक महिना अगोदरपासून नृत्याचे क्लासेस घेऊ लागले आहेत. पाठ उघडी ठेऊन त्यावर रंगरंगोटी करण्याचे किळसवाणे फॅड गेल्या काही वर्षांपासून तरुणींमध्ये शिरले आहे. नऊ दिवस नऊ रंगांचे कपडे परिधान करणे, कपड्यांसह त्यांना मॅचिंग आभूषने परिधान करणे, साजेसा मेकअप करणे, गरबा नृत्य करताना अथवा दांडिया खेळताना इतरांपेक्षा वेगळे दिसण्याचा प्रयत्न करणे याकडेच महिलांचा अधिक कल दिसून येतो. एका राक्षसी प्रवृत्तीवर प्रकट स्त्रीशक्तीने युद्ध करून मिळवलेला विजय म्हणजे नवरात्रीचा उत्सव. या नऊ दिवसांत देवीने युद्ध करून क्षात्रतेजाच्या उपासनेचे महत्व पटवून दिले. स्त्री ही अबला नसून प्रसंगी अन्याय अत्याचाराचा कर्दनकाळ ठरू शकते हे देवीने स्वतः युद्ध करून दाखवून दिले. आज आपण नवरात्रीच्या काळात दांडिया किंवा टिपऱ्या खेळतो, हा खेळ नसून ते युद्धाचे प्रतीकात्मक स्वरूप आहे हेही आज अनेकांना माहित नाही.

आजमितीला स्त्रियांवरील अत्याचाराच्या घटना कमालीच्या वाढल्या आहेत. ३ वर्षाच्या बालिकेपासून वयोवृद्धाही आज सुरक्षित नाहीत. लव्ह जिहादरूपी राक्षस हिंदू स्त्रियांना विविध आमिषे आणि प्रलोभने दाखवून त्यांना प्रेमाच्या जाळ्यात ओढून हिंदूंचा वंशविच्छेद करू लागला आहे. राजकीय मंडळींना स्त्रियांच्या सुरक्षेपेक्षा राज्यात आपली सत्ता आणणे अधिक महत्वाचे वाटत असल्याने स्त्री सुरक्षेच्या दृष्टीने ठोस पावले उचललीच जात नाहीत. अशा वेळी स्त्रियांनीच आपल्या सुरक्षेसाठी सज्ज झाले पाहिजे. समाजाची ढासळलेली नीतिमत्ता पाहता प्रतिकूल प्रसंगांना सामोरे जाण्याची वेळ स्त्रियांवर कधीही येऊ शकते यासाठी प्रत्येक स्त्रीने आपले शरीर आणि मन प्रतिकारक्षम ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. त्याकरिता स्त्रियांनी स्वरक्षणाचे प्रशिक्षण घेणे आज अत्यंत गरजेचे बनले आहे. कराटे, लाठीकाठी यांसह आपल्या दैनंदिन वापरातील वस्तूंच्या आधारे स्वतःचे रक्षण कसे करावे, प्रवासात स्वरक्षणासाठी कोणती साधने स्वतःसोबत बाळगावीत यांचे विनामूल्य प्रशिक्षण देणाऱ्या संस्था आणि संघटना आज गावोगावी आहेत.

त्यांचा लाभ करून स्वतःतील आत्मबल



वाढवूया. जेव्हा कधी आपल्यावर प्रतिकूल प्रसंग येईल तेव्हा आपले नातेवाईक, मित्र मंडळी, पोलीस, राजकीय मंडळी आपले रक्षण करण्यास वेळेत पोहोचतील याची शाश्वती नाही अशा वेळी समोरच्याशी दोन हात करून त्याला धडा शिकवायचा असेल तर तेव्हढी शारीरिक आणि मानसिक क्षमता आपल्यामध्ये असणे आज आवश्यक आहे. आपल्यासोबत आपल्या परिसरातील, कार्यालयातील स्त्रियांना सबला बनवण्याचे दायित्व आज स्त्रियांनीच घेण्याची वेळ आली आहे. स्त्रियांना कायद्याचेही संरक्षण असल्याने समाजातील वासनांध प्रवृत्तीचा नायनाट करण्यासाठी स्त्रियांनीच पुढे यायला हवे. आजच्या स्त्रियांसमोर आदर्श हवा आहे तो रणरागिणी झाशीच्या राणीचा, राजमाता जिजाबाईंचा, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरांचा. राणी चेन्नमांचा. स्त्रीशक्तीचा या प्रकट रूपाची उपासना करण्याची वेळ आता आली आहे. त्यामुळे या नवरात्रीला नवरात्री उत्सवामागील भावार्थ समजून घेऊन दुर्गादेवीच्या मारक रूपाची उपासना करण्याचा संकल्प करा.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## स्मृती चिन्ह

घरमाझे अपुरे पडले
स्मृती चिन्हांची गर्दी
वाट पाहतेयं जागेची
रे चिन्हे अधिकअर्धी

मूक वाद विवाद करे
हो नंबर माझा आधि
वाट पाहती रांगेमध्ये
शोकेस मिळेलं कधी

काहीचिन्हे कायमची
बळकावून बसे गादी
सारखेमिळते मेमोंटो
लांबतचं राहिलीयादी

काहीचिन्हे उत्कृष्ट ती
काही दिसायले साधी
सन्मान वाढवी सतत
परिणाम सुयोगसाधी

स्मृती उजाळा सुखद
आठवण जागे सुगंधी
पोच पावती स्नेहाची
येई दृढताऋणानुबंधी

नात मिळवते मेमोंटो
सुरु होई नवयुग नांदी
स्मृतिचिन्ह माझेशून्य
अधिक आता आनंदी

**– हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# नवरात्रीचे माहात्म्य लहानपणीच रुजवा !

नवरात्री म्हणजे रात्री उशिरापर्यंत दांडिया खेळणे आणि नऊ दिवस नऊ रंगांचे कपडे परिधान करणे असाच समज आजच्या तरुण पिढीचा झाला आहे, खरेतर हिंदू धर्मातील प्रत्येक सणाचे एक वेगळे वैशिष्ट्य असून स्थानपरत्वे तो साजरा करण्याच्या पद्धतीही बदलतात.

महाराष्ट्रात त्यातही मुंबई ठाण्यात गुजराती नागरिक मोठ्या संख्येने असल्याने तरुणांवर गरबा आणि दांडियाचा विशेष प्रभाव असल्याचे दिसते. त्यामुळे महाराष्ट्राच्या मातीत तो कसा साजरा करायला हवा याविषयी आजची पिढी अनभिज्ञ असल्याचे लक्षात येते. महाराष्ट्रात घटस्थापना ही प्रधान असते. त्याच्यासमवेत अखंड नंदादीप तेवत ठेवला जातो, काही ठिकाणी त्रिकाळपूजन केले जाते, सुवासिनी



नवरात्रीच्या दिवसांत सप्तशती ग्रंथाच्या पाठांचे वाचन करतात, कुमारिकांचे पूजन करून त्यांना भोजन दिले जाते. नऊ दिवस एकभोजनी किंवा निराहार उपवास केला जातो. रात्री देवीचा जागर केला जातो. ललिता पंचमी, महालक्ष्मी पूजन (घागरी फुंकणे), अष्टमीचे होमहवन, सरस्वती आवाहन-पूजन अशा प्रकारचे धार्मिक विधी नवरात्रीच्या निमित्ताने केले जातात. काही ठिकाणी भोंडल्याचे आयोजन केले जाते. पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या या प्रथा आता राज्यातील काही भागांपुरत्या मर्यादित राहिल्या आहेत. यंदाचा नवरात्री उत्सव कोरोनाच्या प्रभावाखाली साजरा होत असल्याने तो सार्वजानिक पद्धतीने साजरा करताना अनेक बंधने येणार आहेत. पुढे येणाऱ्या पिढीला नवरात्री हा देवीच्या उपासनेचा उत्सव आहे हेही कदाचित आपल्याला सांगावे लागेल. अशी वेळ येऊ नये म्हणून नवरात्री उत्सवाचे माहात्म्य आणि तो कसा साजरा करावा याविषयीचीचे ज्ञान लहानपणीच आपल्या पाल्यांना द्या.

**– सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

### राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेसाठी वेदिका इंगोलेची निवड



### नागपूर विभागीय स्पर्धेत सुवर्णपदकासह कांस्यपदकाची कमाई

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०९, नागपूर :** भंडारा येथे नुकत्याच पार पडलेल्या नागपूर विभागीय स्तरीय तलवारबाजी स्पर्धेत सेंट अँन्स इंग्लिश मीडियम स्कूल, दहेगाव (रं.) येथील विद्यार्थिनी वेदिका इंगोले हिने उल्लेखनीय कामगिरी करत राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड मिळवली आहे. नागपूर विभागातील सात जिल्ह्यांतील खेळाडूंच्या सहभागातून झालेल्या या स्पर्धेत वेदिकाने फॉईल प्रकारात सुवर्णपदक, तर इपी प्रकारात कांस्यपदक पटकावले. या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर तिची राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. वेदिकाच्या या यशात तलवारबाजी प्रशिक्षक राहुल मांडवकर, मोनल बागडे आणि तन्मय सावरकर यांचे मार्गदर्शन लाभले. तिच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल नागपूर जिल्हा तलवारबाजी संघटनेचे सचिव मोहम्मद सोयब यांनी वेदिकाचे अभिनंदन केले. वेदिकाच्या यशाबद्दल मुख्याध्यापिका सिस्टर क्लिओफास, उपमुख्याध्यापिका सिस्टर प्रीती, व्यवस्थापक सिस्टर सीरिया पुष्पम, क्रीडा विभाग प्रमुख खुशाल इंगोले, प्रतीक उमक, सिद्धार्थ माघाडे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

### मुंबई उपनगर सब-ज्युनियर व ज्युनियर मुले व मुली जिल्हास्तर नेटबॉल स्पर्धेचे आयोजन

**अक्षराज : संदीप येवले**

**दि.०९, मुंबई :** नेटबॉल असोशिएशन ऑफ मुंबई उपनगर च्या वतीने दिनांक १२ अक्टोबर २०२६ रोजी मुंबई उपनगर सब-ज्युनियर (१६) व ज्युनियर (१९) वर्षातील मुले/मुली) जिल्हास्तरीय नेटबॉल स्पर्धेचे अयोजन करण्यात येत आहे. ही स्पर्धा ऑक्सफर्ड पब्लिक स्कूल, कांदिवली, मुंबईच्या मैदानावर रंगणार असून या स्पर्धेत मुंबई उपनगर मधील विविध शाळा, महाविद्यालय व कल्ब चे संघ सहभागी होऊ शकतात. सहभागी संघातील खेळाडूंना संघटनेची अधिकृत नोंदणीकृत खेळाडू नोंदणी (रजिस्ट्रेशन) असणं आवश्यक आहे. त्याशिवाय त्या खेळाडूंना स्पर्धेत खेळता येणार नाही.

**स्पर्धेची ठळक वैशिष्टे**

सबज्युनियर (१६ वर्षातील) खेळाडूचा जन्म हा ०१/०१/२०११ वा त्यानंतर असावा

ज्युनियर (१९ वर्षातील) खेळाडूचा जन्म हा ०१/०१/२००८ वा त्यानंतर असावा

नोंदणी शुल्क १००/- प्रती खेळाडू राहील

संघांनी आपली नोंदणी दिनांक ११ ऑक्टोबर २०२६ सायं ०४.०० वा,पर्यंत करणे आवश्यक आहे.

अधिक माहिती साठी श्लोक अंचन. मोबाईल ९८१९१६६०५५ यांच्याशी संपर्क साधावा असे संघटनेचे सचिव श्लोक आंचन यांनी केले आहे. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मानसी, राज, इतर परिश्रम घेत आहे.

### शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०८, नागपूर :** महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह शताब्दी व महात्मा फुले जयंती द्विशताब्दी (२०० वर्ष) निमित्त सामाजिक न्याय, समता व मानवी हक्क या मूल्यांची जाणीव विद्याध्यर्थ्यांमध्ये जागृत करणे या उद्देशाने महाराष्ट्र शामनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा सार्वनिक उपक्रम डॉ.बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान नागपूर मार्फत राज्यरतगयर पदवी व पदव्यूतर सर्व विद्यापीठे व त्यांच्या अंतर्गत महाविद्यालये (कृषी, पशु व मत्स्य विज्ञान आणि आरोग्य विद्यापीठ वगळून) विद्यार्थ्यांकरीता निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन नोंदणी करुन घेण्यात येणार आहे. निबंध स्पर्धेसंबंधी आवश्यक सविस्तर सुचना, अटी-शर्ती व कार्यपध्दती मराठी भाषेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान, नागपूर यांचे https://dbaspratishthan.in या अधिकृत वेबसाईटवर उपलब्ध आहे. निबंध मराठी अथवा इंग्रजी भाषेत लिहिता येईल. निबंधाची तपासणी झाल्यानंतर सदर पोर्टलवर निकाल जाहीर करुन पुरस्काराचे प्रदान रोख रक्कमेचे स्वरुपात बक्षिस देण्यात येईल. अधिक माहितीसाठी उपरोक्त वेबसाईटवर भेट द्यावी. सर्व महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे याचे आव्हान करण्यात येत आहे. ऑनलाईन नोंदणीची अंतिम तारीख ३१ ऑक्टोबर, २०२६ असून ऑनलाईन निबंध सादर करावयाची तारीख ०१/१२/२०२६ ते ३१/१२/२०२६ ही आहे, अशी माहिती डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान नागपूरचे व्यवस्थापकीय संचालक सुरेंद्र पवार यांनी काढलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केलेली आहे.

### दुष्काळी परिस्थितीच्या पाहणीसाठी डॉ.गोरे यांचा उदगीर तालुका दौरा

**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.०९, उदगीर (लातुर) :** उदगीर तालुक्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी विधान परिषदेच्या मा.उपसभापती डॉ.नीलम गोरे यांनी तालुक्याचा दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी विविध गावांमध्ये जाऊन पिकांची स्थिती, पाणीटंचाई तसेच शेतकरी आणि ग्रामस्थांच्या अडचणींची माहिती घेतली. पावसाअभावी खरीप हंगामातील पिकांवर परिणाम झाला असून अनेक भागांत पाण्याची समस्या गंभीर बनली आहे. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याचे ग्रामस्थांनी डॉ.गोरे यांच्या निदर्शनास आणून दिले. यावेळी शेतकऱ्यांनी दुष्काळग्रस्त भागाची तातडीने पाहणी करून शासनामार्फत आवश्यक मदत, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, पिकांचे नुकसान भरपाई तसेच इतर उपाययोजना करण्याची मागणी केली. डॉ.गोरे यांनी संबंधित अधिकारी व स्थानिक प्रशासनाकडून परिस्थितीची माहिती घेतली. दुष्काळी परिस्थितीचा अहवाल शासनाच्या निदर्शनास आणून देऊन आवश्यक उपाययोजनांसाठी पाठपुरावा करण्याचे त्यांनी सांगितले. दौऱ्यावेळी स्थानिक पदाधिकारी, आमदार सुधाकर भालेराव जि.अधक्ष चंद्रकांत टगेटोल माधव टेपाले शिवसेना शिंदे गटाचे कार्यकर्ते अधिकारी, शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## हिवरे कोरड्यात मळगंगा मातेच्या नवरात्रोत्सवाला उद्यापासून प्रारंभ

### दुष्काळमुक्तीसाठी ग्रामस्थांचे देवीचरणी साकडे



**हजारो भाविकांचे श्रद्धास्थान**

मळगंगा देवी हे हिवरे कोरडा परिसरातील हजारो भाविकांचे जागृत श्रद्धास्थान आहे. नवसाला पावणारी देवी अशी तिची ख्याती आहे. नवरात्रोत्सव काळात दर्शनासाठी पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने येतात. यंदाही मंदिर समितीच्या वतीने पहाटे महाअभिषेक, दैनंदिन भजन, कीर्तन आणि महाआरतीसह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

**पाण्याचे स्रोत आटले; शेतकरी चिंतेत**

दुसरीकडे गावासमोरील वास्तव अत्यंत गंभीर आहे. अपुऱ्या पावसामुळे विहिरी, बंधारे आणि पाण्याचे स्रोत आटत चालले आहेत. उपलब्ध पाणी काटकसरीने वापरावे लागत आहे. चारा टंचाईमुळे पशुधन जगवायचे कसे, हा प्रश्न शेतकऱ्यांपुढे उभा आहे. शेती, पशुधन आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह अशा तिहेरी संकटात शेतकरी सापडला असून, सर्वांचे लक्ष आता मळगंगा मातेच्या कृपेवर लागले आहे.

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०९, पारनेर (अहिल्यानगर) :** ग्रामदैवत मळगंगा देवीच्या जयघोषात हिवरे कोरडा (ता. पारनेर) येथे रविवार, दि. ११ ऑक्टोबरपासून शारदीय नवरात्रोत्सवाला भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला आहे. संपूर्ण गाव देवीच्या भक्तीत न्हाऊन निघाले असतानाच, यंदा निसर्गाच्या अवकृपेमुळे भक्तांच्या डोळ्यात चिंतेचे सावट ही आहे.

यंदा पावसाने मोठी ओढ दिल्याने हिवरे कोरडा परिसरात भीषण दुष्काळाचे सावट पसरले आहे. पिण्याच्या पाण्याची टंचाई, जनावरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न आणि शेतीचे कोलमडलेले गणित यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. याच संकटातून तारण्यासाठी ग्राम स्थांनी मळगंगा मातेच्या चरणी आर्त साकडे घातले आहे. आई मळगंगामाते, आमच्यावरील दुष्काळाचे संकट दूर कर, पाऊस पडू दे आणि या कठीण परिस्थितीला सामोरे जाण्याचे बळ दे, अशी एकमुखी प्रार्थना मंदिरात ग्राम स्थांनी केली.

## दुष्काळी पंचनाम्याचे फॉर्म जमा करण्यासाठी गर्दी; तलाठी कार्यालयात गजबज

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०९, पारनेर (अहिल्यानगर) :** शासनाने जाहीर केलेल्या दुष्काळी तालुक्यांच्या यादीत पारनेरचा समावेश आहे. दुष्काळामुळे नुकसानग्रस्त पिकाचे पंचनामे करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे तलाठी कार्यालयात जमा करण्यासाठी शेतकऱ्यांची प्रचंड गर्दी दिसून येत आहे.

अनावृष्टीने अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना फुल ना फुलाची पाकळी मदत व्हावी म्हणून शासनाने पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. पंचनामे करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे याममध्ये विहीत नमुन्यातील अर्ज, ७/१२, ८ अ, आधार कार्ड झेरॉक्स, बँक पासबुक झेरॉक्स, फार्मर आयडी, पिक नुकसानीचा फोटो अशी आवश्यक कागदपत्रे तलाठी कार्यालयात जमा करण्यासाठी शेतकऱ्यांची प्रचंड गर्दी दिसून येत आहे. तालुक्यातील सर्व गावांमध्ये कागदपत्रे जमा करून घेतली जात आहेत.

सध्या तर टाकळी ढोकेश्वर व ढोकी, वासुंदे, वडगाव सावताळ येथील शेतकऱ्यांची गर्दी दिसून येत आहे. दुष्काळामुळे आर्थिक अडचणीत असणाऱ्या शेतकऱ्यांना शासनाकडून किमान दिवाळीला तरी चार पैसे मिळतील अशी अपेक्षा शेतकरी ठेवून आहेत. यामुळेच शेतकऱ्यांची सध्या धावपळ दिसून येत आहे. मात्र सर्व्हर बंद असल्यामुळे अडचण येत आहे.

**सरसकट मदत मिळाली पाहिजे**

संपूर्ण पारनेर तालुक्यातच भीषण दुष्काळी परिस्थिती आहे. दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीचा लाभ मिळावा, यासाठी तालुक्यातील सर्वच शेतकऱ्यांना कोणत्याही जाचक अटी न लावता सरसकट मदत मिळाली पाहिजे. शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये, यासाठी प्रशासनाने काळजी घ्यावी

**– अरुणा खिलारी (सरपंच, टाकळी ढोकेश्वर)**

## पेण - खोपोली मार्गावर पांढरे पट्टे गायब; वाहनचालकांची कसरत !

### रस्त्याला भेगा, गतिरोधकांवरील पट्टेही अस्पष्ट; अपघाताचा धोका वाढला, नागरिकांकडून तातडीच्या दुरुस्तीची मागणी

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.०९,पेण (रायगड) :** पेण-खोपोली मार्गावर रस्त्याच्या कडेला असलेले पांढरे पट्टे तसेच गतिरोधकांवरील पांढरे पट्टे पुसट झाल्याने वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यातच अनेक ठिकाणी रस्त्याला भेगा पडल्याने विशेषतः दुचाकीस्वारांची मोठी दमछाक होत आहे. रात्रीच्या वेळी रस्त्यावरील पट्टे स्पष्ट दिसत नसल्यामुळे वाहन चालवताना चालकांना रस्त्याचा अंदाज घेणे कठीण होत असून, अपघाताचा धोका निर्माण झाला आहे.



पेण - खोपोली मार्ग हा परिसरातील नागरिकांसाठी महत्त्वाचा दळणवळणाचा मार्ग आहे. या मार्गाच्या दुतर्फा अनेक गावे वसलेली असून, प्रत्येक नाक्यावर नागरिकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. स्थानिक नागरिक, विद्यार्थी, कामगार तसेच दुचाकी आणि चारचाकी वाहनचालक या मार्गाचा नियमित वापर करतात.

मात्र, रस्त्यावरील पांढरे पट्टे पुसट झाल्याने आणि काही ठिकाणी पूर्णपणे नाहीसे झाल्याने वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

**रात्रीच्या प्रवासात वाहनचालकांची कसरत**

दिवसा रस्त्याचा अंदाज घेऊन वाहन चालवणे काही प्रमाणात शक्य होते. मात्र, रात्रीच्या वेळी रस्त्याच्या कडेला असलेले पांढरे पट्टे स्पष्ट दिसत नसल्याने वाहन नेमके कुठे चालवायचे, याचा अंदाज घेणे कठीण होते. त्यातच समोरून येणाऱ्या वाहनांच्या दिव्यांचा प्रकाश आणि रस्त्यावरील भेगा यामुळे दुचाकीस्वारांना अधिक सावधगिरी बाळगावी लागत आहे. अचानक समोर येणारा गतिरोधक लक्षात न आल्यास वाहनावरील नियंत्रण सुटण्याचीही शक्यता आहे.

**रस्त्यावरील भेगांमुळे दुचाकीस्वार त्रस्त**

पेण-खोपोली मार्गावरील अनेक ठिकाणी रस्त्याला भेगा पडल्या आहेत. या भेगांमुळे दुचाकी चालवताना वाहनचालकांना कसरत करावी लागत आहे. विशेषतः पावसाळ्यानंतर रस्त्याची स्थिती आणि रस्त्यावरील खुणांची दृश्यमानता याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. रस्त्याच्या कडेला पांढरे पट्टे नसल्याने रात्रीच्या वेळी रस्त्याची मर्यादा ओळखणे कठीण होते. त्यामुळे दुचाकीस्वारांसह इतर वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

**पांढरे पट्टे आणि गतिरोधकांवरील रंगकाम तातडीने करावे**

रस्त्याच्या कडेला असलेले पांढरे पट्टे, गतिरोधकांवरील पांढरे पट्टे आणि इतर आवश्यक रस्ते खुणा नव्याने रंगविण्याची गरज आहे. तसेच रस्त्यावरील भेगा आणि खराब झालेल्या भागांची पाहणी करून आवश्यक दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

संबंधित विभागाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन पेण-खोपोली मार्गावरील पांढरे पट्टे स्पष्ट दिसतील, यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात. रस्त्याची आवश्यक दुरुस्ती करून गतिरोधकांवरही ठळक रंगकाम करावे, जेणेकरून रात्रीच्या वेळी वाहनचालकांना सुरक्षितपणे प्रवास करता येईल, अशी अपेक्षा परिसरातील नागरिक व्यक्त करीत आहेत.

## माथेरानमध्ये रेल्वेच्या जागेवर अतिक्रमणाचा प्रश्न ऐरणीवर रेल्वे प्रशासनाच्या कारवाईकडे नागरिकांचे लक्ष

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.०९, माथेरान :** माथेरानमध्ये रेल्वे प्रशासनाच्या जागेवर झालेल्या बांधकामांचा आणि अतिक्रमणांचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. रेल्वेच्या मालकीच्या जागेवर अनेक वर्षांपासून विविध प्रकारची बांधकामे आणि दुकाने उभी असल्याचे दिसून येते. या जागांबाबत रेल्वे प्रशासनाकडून नेमकी कोणती कारवाई केली जाणार, याकडे आता स्थानिक नागरिकांचे लक्ष लागले आहे.माथेरानमध्ये रेल्वे मार्गालगत तसेच बाजारपेठेतील काही भागांमध्ये विविध दुकाने आणि बांधकामे आहेत. यातील काही जागांवर अनेक वर्षांपासून व्यवसाय सुरू आहेत. त्यामुळे या बांधकामांमागील मालकी हक्क, परवानग्या आणि प्रत्यक्ष जागेची स्थिती याबाबत स्पष्टता असणे आवश्यक आहे. संबंधित जागा रेल्वेच्या मालकीच्या असतील, तर त्यावरील बांधकामांबाबत प्रशासनाने नियमांनुसार निर्णय घेणे गरजेचे आहे. दुसरीकडे, माथेरान नगरपालिकेकडूनही विविध भागांतील बांधकामे आणि जागांची पाहणी केली



जात असल्याचे समोर येत आहे. मात्र, अतिक्रमणांच्या प्रश्नावर रेल्वे प्रशासन आणि नगरपालिका यांच्यात नेमका समन्वय कसा आहे, तसेच यापूर्वी दिलेल्या नोटिसांवर काय कार्यवाही झाली. याबाबत नागरिकांना स्पष्ट माहिती मिळणे आवश्यक आहे.माथेरान हे पर्यटनस्थळ असल्याने येथील जागांना विशेष महत्त्व आहे. मर्यादित जागा, वाढती व्यावसायिक गरज आणि जुन्या बांधकामांचा प्रश्न यामुळे प्रशासनासमोर अनेक आव्हाने आहेत. काही बांधकामे अनेक वर्षांपासून अस्तित्वात असल्याने त्यांच्याबाबत निर्णय घेताना संबंधित कागदपत्रे, परवानग्या आणि कायदेशीर बाबी तपासणे आवश्यक ठरणार आहे.अतिक्रमणांवर कारवाई करायची असल्यास ती कोणताही भेदभाव न करता, सर्व संबंधितांना योग्य ती कायदेशीर प्रक्रिया पाळून करणे गरजेचे आहे. तसेच कारवाई केवळ नोटिसांपुरती मर्यादित न राहता त्याबाबत ठोस कार्यवाही होणेही तितकेच महत्त्वाचे आहे.रेल्वेच्या जागेवरील बांधकामांबाबत रेल्वे प्रशासनाने स्पष्ट भूमिका मांडावी, अशी नागरिकांची मागणी आहे . कोणत्या जागा रेल्वेच्या मालकीच्या आहेत, कोणत्या बांधकामांना परवानगी आहे आणि नियमांचे उल्लंघन आढळल्यास पुढील कार्यवाही काय असेल, याची माहिती नागरिकांसमोर येणे आवश्यक आहे.माथेरानचा विकास, स्थानिक व्यावसायिकांचे प्रश्न आणि सार्वजनिक जागांचे संरक्षण या सर्व बाबींचा विचार करून प्रशासनाने पारदर्शक पद्धतीने निर्णय घ्यावा. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रश्नावर आता संबंधित विभागांनी एकत्रितपणे पुढाकार घेऊन स्पष्ट तोडगा काढावा, अशी भावना स्थानिकांकडून व्यक्त होत आहे.

# कांदा रोपे तयार; पण पाऊस गायब

## रोपे लावायची कुठे? विकायची तरी कुणाला?



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०९, अहिल्यानगर :** कांदा लागवडीच्या आशेने रोपवाटिका तयार केली, पाणीटंचाई असतानाही रोपे जपली; मात्र ऐन लागवडीच्या काळात पावसाने दडी मारल्याने तयार झालेली कांदा रोपे विकण्याची वेळ रोपवाटिका उत्पादकांवर आली आहे. जमिनीत पुरेसा ओलावा नसल्याने शेतकरी लागवड करण्यास धजावत नाहीत. अनेकांकडे सिंचनाची खात्री नसल्याने रोपे घेणार कोण? असा प्रश्न उत्पादकांसमोर निर्माण झाला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यात यंदा पावसाचा दीर्घ खंड पडल्याने खरीप हंगाम अडचणीत आला आहे. कांदा लागवडीचे नियोजन करून अनेक शेतकऱ्यांनी स्वतःच्या शेतासह इतर शेतकऱ्यांसाठीही रोपवाटिका तयार केल्या. बियाणे, पाणी, खते, औषधे आणि मजुरीवर मोठा खर्च करून रोपे वाढविली. मात्र, अपेक्षित पाऊस न झाल्याने लागवडीचे संपूर्ण गणित कोलमडले आहे.

**रोपे तयार; पण पाणी नाही...!**

कांद्याची रोपे शेतात लावण्यासाठी जमिनीत पुरेसा ओलावा असणे आवश्यक आहे. लागवडीनंतर ही पाण्याची गरज भासते. मात्र, पावसाचा खंड आणि मर्यादित सिंचनाची सुविधा यामुळे शेतकरी कांदा लागवडीचा निर्णय पुढे ढकलत आहेत. परिणामी तयार झालेली रोपे विक्रीअभावी रोपवाटिकेतच पडून आहेत. खर्च झाला; उत्पन्नाची शाश्वती नाही रोपवाटिका तयार करताना झालेला खर्च वेळेस रोपे विकली गेल्यासच भरून निघतो. मात्र, पाऊस लांबल्याने रोपांची मागणी घटली असून उत्पादकांचा पैसा अडकला आहे. त्यामुळे पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांसोबतच रोपवाटिका उत्पादकांचीही आर्थिक कोंडी झाली आहे. एकीकडे कांदा लागवडीसाठी पाऊस नाही, तर दुसरीकडे तयार झालेली कांदा रोपे खरेदी करण्यासाठी ग्राहक नाहीत, अशी विचित्र परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाचा खंड आणखी वाढल्यास कांदा लागवडीच्या नियोजनावर तसेच उत्पादकांच्या आर्थिक गणितावर मोठा परिणाम होण्याची चिंता शेतकरी व्यक्त करीत आहेत.

## बोरीत प्रसिद्ध व्यापाऱ्याची ऑनलाइन फसवणूक; मोबाईल हॅक करून सुमारे ६७ हजार रुपये लंपास

**अक्षराज : जफर शेख**

**दि.०९, बोरी :** बोरी येथील प्रसिद्ध व्यापारी तथा गोळी-बिस्किटांचे ठोक विक्रेते महाराष्ट्र कन्फेक्शनरीचे मालक शेख जुबेर यांची ऑनलाइन फसवणूक झाल्याची घटना समोर आली आहे. अज्ञात व्यक्तीने त्यांचा मोबाईल हॅक करून विविध यूपीआय आयडींच्या माध्यमातून जवळपास ६७ हजार रुपये काढून घेतल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरातील व्यापारी वर्गात चिंतेचे वातावरण आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शेख जुबेर यांच्या श्री साई बाबा नागरी सहकारी बँक बोरी येथे करंट खाता आहे. खात्यातून ९,९९९.९९ रुपयांचे अनोळखी सहा व्यवहार, तसेच ४ हजार रुपयांचा एक, १ हजार रुपयांचा दोन, पाचशे रुपयाचा एक आणि ४०० रुपयांचा एक व्यवहार करण्यात आले. विविध यूपीआय आयडींच्या माध्यमातून ही रक्कम काढण्यात आल्याचे बँक स्टेटमेंटवरून निर्दशनास आले आहे.

बँकेचे स्टेटमेंट तपासले असता त्यामध्ये जयवीर, विकास कुमार, खैरुल अनाम, एस. हुसेन आणि सोनू अशी नावे दिसून आल्याची माहिती बँकेचे शाखा व्यवस्थापक यांनी दिली. या प्रकरणी त्यांनी सायबर विभागाकडे तक्रार दाखल केली आहे.

दरम्यान, बोरी येथील नव्याने रुजू झालेले सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शिवसांभ स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी अमोल मुंडे, रंगेज मॅडम व पवार या प्रकरणाचा तपास करीत आहेत.

**नागरिकांनी सतर्क राहावे : एपीआय स्वामी**



ऑनलाइन फसवणुकीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन एपीआय स्वामी यांनी केले आहे. कोणत्याही अनोळखी व्यक्तीला आपली गोपनीय माहिती देऊ नये. अनोळखी लिंक उघडू नये तसेच बँक खात्याशी संबंधित माहिती, ओटीपी आणि इतर गोपनीय तपशील कोणासोबतही शेअर करू नयेत, असे आवाहन त्यांनी केले आहे. ऑनलाइन व्यवहार करताना योग्य ती खबरदारी घेतल्यास अशा फसवणुकीच्या घटनांना आळा घालण्यास मदत होऊ शकते.

## कामोठे अतिक्रमणांवर हातोडा; मग सेक्टर ३५ मधील निळकंठ मिठाईच्या कथित अनधिकृत बांधकामाला अभय का?

**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.०९, पनवेल :** कामोठे शहरातील पदपथांवरील अतिक्रमणांचा प्रश्न ऐरणीवर आला असतानाच पनवेल महानगरपालिकेकडून गेल्या दोन दिवसांपासून अतिक्रमणांविरोधात कारवाईचा धडाका सुरू आहे. या मोहिमेदरम्यान विविध दुकानांसमोरील पदपथांवरील कथित अनधिकृत बांधकामे हटविण्यात येत असून, काही ठिकाणी अतिक्रमणांवर हातोडा चालवण्यात आला आहे. मात्र, ही कारवाई सर्वच ठिकाणी समान निकष लावून केली जात आहे का, असा प्रश्न आता उपस्थित होऊ लागला आहे. कामोठेतील सेक्टर ३५ मधील निळकंठ मिठाई दुकानासमोरील कथित अनधिकृत बांधकाम अद्याप कायम असल्याचे दिसत असल्याने महापालिकेच्या कारवाईबाबत नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. महानगरपालिकेकडून शहरातील रस्ते आणि पदपथ अतिक्रमणमुक्त करण्यासाठी मोहीम राबविण्यात येत आहे. पदपथांवर वाढविण्यात आलेले दुकानांचे भाग, रस्त्यालगत उभारण्यात आलेली बांधकामे आणि पादचाऱ्यांच्या मार्गात अडथळा ठरणाऱ्या संरचनांमुळे नागरिकांना अनेकदा रस्त्यावरून चालावे लागते. त्यामुळे अशा अतिक्रमणांवर कारवाई करणे आवश्यक असल्याची भूमिका नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. त्याच पार्श्वभूमीवर महापालिकेने सुरू केलेल्या कारवाईचे स्वागत होत असतानाच, कारवाईच्या अंमलबजावणीत सर्वांना समान वागणूक मिळते का, याबाबत चर्चा सुरू झाली आहे.




कामोठे परिसरातील अनेक दुकानांसमोरील अतिक्रमणे हटविण्याची कारवाई सुरू असताना सेक्टर ३५ मधील निळकंठ मिठाई दुकानासमोरील कथित अनधिकृत बांधकामाकडेही लक्ष देण्याची मागणी होत आहे. इतर व्यावसायिकांच्या दुकानांसमोरील बांधकामांवर कारवाई होत असेल, तर या ठिकाणीही संबंधित नियमांनुसार तपासणी करून आवश्यक ती कारवाई केली जाणार का, असा सवाल उपस्थित केला जात आहे. एखाद्या ठिकाणी कारवाई करणे आणि दुसऱ्या ठिकाणी कथित अतिक्रमण कायम राहणे, असे चित्र निर्माण झाल्यास प्रशासनाच्या कार्यपद्धतीबाबत नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होऊ शकतो. नियम सर्वांसाठी समान असावेत, ही नागरिकांची अपेक्षा अतिक्रमणविरोधी कारवाई करताना कोणताही व्यावसायिक मोठा किंवा लहान, याचा विचार न करता नियमांच्या आधारे निर्णय घेतला जावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पदपथ हा पादचाऱ्यांच्या वापरासाठी असून, त्यावर अतिक्रमण झाल्यास ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान मुले आणि दिव्यांग व्यक्तींना अडचणींचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे महापालिकेने संपूर्ण परिसरातील अतिक्रमणांची वस्तुनिष्ठ तपासणी करून नियमानुसार कारवाई करणे आवश्यक आहे. दरम्यान, निळकंठ मिठाई दुकानासमोरील बांधकाम अधिकृत आहे की अनधिकृत, याबाबत महापालिकेच्या संबंधित विभागाकडून अधिकृत माहिती समोर येणे महत्त्वाचे ठरणार आहे. तसेच संबंधित बांधकामाची तपासणी करण्यात आली आहे का, त्याबाबत कोणती नोटीस देण्यात आली आहे का आणि कारवाई न झाल्यास त्यामागील प्रशासकीय कारण काय आहे, याची स्पष्टता होणे आवश्यक आहे.

**महापालिका प्रशासनाच्या स्पष्टीकरण याकडे लक्ष**

अतिक्रमण हटविण्याच्या मोहिमेत कोणताही भेदभाव होत नसल्याचे स्पष्ट करण्यासाठी महापालिका प्रशासनाने संबंधित ठिकाणची वस्तुस्थिती तपासून भूमिका मांडणे गरजेचे आहे. इतर दुकानांवर कारवाई सुरू असताना सेक्टर ३५ मधील या दुकानासमोरील कथित बांधकामाबाबतही समान निकषांनुसार निर्णय घेतला जाणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. प्रशासनाकडून याबाबत अधिकृत स्पष्टीकरण मिळाल्यानंतरच या प्रकरणातील वस्तुस्थिती स्पष्ट होऊ शकेल. एकूणच, अतिक्रमणमुक्त शहरासाठी सुरू असलेली मोहीम केवळ काही ठिकाणांपुरती मर्यादित न राहता संपूर्ण परिसरात पारदर्शकपणे आणि समान नियमांच्या आधारे राबविली जावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. त्यामुळे निळकंठ मिठाई दुकानासमोरील कथित बांधकामाची महापालिका प्रशासनाकडून तपासणी होऊन नियमानुसार पुढील कार्यवाही केली जाते का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## परभणी-ताडकळस-पालम मार्गावर अतिरिक्त साध्या एसटी बसफेऱ्या सुरू करा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, पालम (परभणी) :** परभणी-ताडकळस-पालम मार्गावर सध्या सुरू असलेल्या एसटी बसफेऱ्या अपुऱ्या पडत असल्याने विद्यार्थी, महिला, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक, शेतकरी, कामगार तसेच सर्वसामान्य प्रवाशांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. त्यामुळे या मार्गावर अतिरिक्त नियमित साध्या एसटी बसफेऱ्या सुरू कराव्यात, अशी मागणी शाहू ज्योती सामाजिक फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या परभणी आगाराकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

परभणी, ताडकळस व पालम या ठिकाणी शिक्षण, शासकीय कामकाज, आरोग्यसेवा तसेच रोजगाराच्या विविध कारणांसाठी परिसरातील गावांमधून नागरिक दररोज प्रवास करतात. मात्र, बसफेऱ्यांची संख्या कमी असल्याने प्रवाशांना बराच वेळ बसची प्रतीक्षा करावी लागते. उपलब्ध बसमध्ये गर्दी होत असल्याने विशेषतः विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

**शिवशाहीऐवजी साध्या बसफेऱ्या वाढविण्याची मागणी...**

परभणी-ताडकळस-पालम मार्गावर




शिवशाही बससेवा सुरू करण्याऐवजी नियमित साध्या एसटी बसफेऱ्यांची संख्या वाढवावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. शिवशाही बसचे तुलनेने अधिक प्रवासभाडे सर्वसामान्य प्रवाशांना परवडणारे नसल्याने विद्यार्थी, शेतकरी, कामगार, महिला व ज्येष्ठ नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रवाशांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन साध्या एसटी बससेवेलाच प्राधान्य द्यावे, अशी भूमिका निवेदनात मांडण्यात आली आहे.

तसेच सकाळच्या व सायंकाळच्या गर्दीच्या वेळेत अतिरिक्त बसफेऱ्या सुरू करून विद्यार्थ्यांसह नोकरदार व सर्वसामान्य प्रवाशांची होणारी गैरसोय दूर करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. सदरील निवेदन शाहू ज्योती सामाजिक फाउंडेशनचे महाराष्ट्र राज्य सचिव सचिन ज्ञानेश्वर सोनकांबळे यांनी परभणी आगाराच्या अधिकाऱ्यांकडे सादर केले.

# थोडक्यात बातम्या

## नगरसेवक शेख अथर नूर यांच्या प्रयत्नाला यश; जिंतूर नगरपरिषदेत बायोमेट्रिक हजेरी सुरू

**अक्षराज : रहीम कोक्कर**



**दि.०९, जिंतूर (परभणी) :** जिंतूर नगरपरिषद कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी वेळेवर उपस्थित राहत नसल्यामुळे नागरिकांची विविध कामे प्रलंबित राहत असल्याच्या तक्रारी समोर येत होत्या. या समस्येकडे लक्ष वेधत नगरसेवक शेख मोहम्मद अथर नूर यांनी नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत हा मुद्दा ठामपणे मांडला होता. त्यांच्या मागणीला यश आले असून शुक्रवार, दिनांक ०९ ऑक्टोबर २०२६ रोजी नगरपरिषद कार्यालयात अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन हजेरीसाठी बायोमेट्रिक (थंब) मशीन बसविण्यात आले आहे. नगरपरिषद कार्यालयात अनेकदा अधिकारी व कर्मचारी कार्यालयीन वेळेत उपस्थित राहत नसल्याने नागरिकांना आपल्या कामांसाठी वारंवार कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत होत्या. त्यामुळे नागरिकांची गैरसोय होत होती. ही बाब लक्षात घेऊन नगरसेवक शेख मोहम्मद अथर नूर यांनी सर्वसाधारण सभेत हा प्रश्न उपस्थित करून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. त्यांच्या मागणीला अखेर यश मिळाले आहे. बायोमेट्रिक हजेरी प्रणालीमुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीवर नियंत्रण ठेवणे शक्य होणार असून, नागरिकांची कामे वेळेत पूर्ण होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## अर्पिताची आंतरराष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धेकडे वाटचाल



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०८, नागपूर :** .बबनराव तायवाडे महाविद्यालय कोराडी येथे कार्यरत प्राध्यापिका अर्पिता सुनील जालंदर यांनी स्पेशल ऑलिम्पिक्सच्या बास्केटबॉल निवड प्रक्रियेत उल्लेखनीय कामगिरी करीत पुढील टप्प्यात प्रवेश मिळविला आहे. ग्वाल्हेर येथे झालेल्या निवड चाचणीत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाल्यानंतर आता तिची ३÷३ बास्केटबॉलच्या प्री-कॅम्पसाठी निवड झाली आहे. १३ ते १५ सप्टेंबर दरम्यान ग्वाल्हेर येथील सीडीएस मैदानावर स्पेशल ऑलिम्पिक्स बास्केटबॉल निवड चाचणी पार पडली. या चाचणीत महाराष्ट्राच्या संघातून अर्पिताने सहभाग नोंदविला. तिच्या कामगिरीची दखल घेत गांधीनगर गुजरात येथे होणाऱ्या कॅम्प प्रशिक्षणासाठी तिची निवड करण्यात आली.

गुजरातमधील गांधीनगर येथे ५ ते १४ ऑक्टोबरदरम्यान स्पेशल ऑलिम्पिक्स ३÷३ बास्केटबॉल प्री-कॅम्प आयोजित करण्यात आला आहे. या शिबिरात देशभरातील निवडक खेळाडू सहभागी होणार असून, त्यातून आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी भारतीय संघाची निवड केली जाणार आहे.

अर्पिताच्या यशाबद्दल आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक विशाल नाईक क्रीडा शिक्षक धैर्यशील सुटे, राजू ठाकरे, विपिन शर्मा, पत्रकार दिवाकर घेर, अमर जैन, मनोज डेव्हिड, डॉ.अहमद शेख, सुनील जालंदर, क्रिष्णा नमलेवार, शीराम सातपुते, केशव पानतावणे, प्रकाश साद, दिलीप गजभिये, कपिल वानखेडे, अभय मिश्रा, राजेश खंडारे, विनोद गोडबोले, मयूर तिरपुडे, गिरधारी शर्मा, विक्की थापा आदींनी अभिनंदन केले आहे.

## बोराडी फार्मसी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची एकात्मिक समुपदेशन आणि चाचणी केंद्राला शैक्षणिक भेट




**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.०९, शिरपूर (धुळे) :** शिरपूर तालुक्यातील किसान विद्या प्रसारक संस्था संचलित इंस्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन, बोराडी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची 'रेड रिबन क्लब' मधील विद्यार्थ्यांनी नुकतीच थाळनेर आणि शिरपूर येथील ICTC (एकात्मिक समुपदेशन आणि चाचणी केंद्र) आणि ART (अँटी-रेट्रोव्हायरल थेरपी) केंद्रांना शैक्षणिक भेट दिली.

सदर भेटी दरम्यान एचआयव्ही/एड्सचा प्रतिबंध, निदान आणि उपचार करणाऱ्या आरोग्य सेवा प्रणालींची प्रत्यक्ष माहिती फार्मसीच्या विद्यार्थ्यांना करून देणे हा या भेटीचा उद्देश होता.

या भेटीदरम्यान, केंद्रातील समुपदेशक, वैद्यकीय अधिकारी आणि प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांनी या केंद्रांच्या दैनंदिन कामकाजाविषयी सविस्तर माहिती दिली. या भेटीतून विद्यार्थ्यांना एचआयव्ही समुपदेशन आणि चाचणी: खुडढउ मध्ये चाचणीपूर्व आणि चाचणीपश्चात समुपदेशन कसे केले जाते, रुग्णांची गोपनीयता कशी राखली जाते आणि निदानासाठी चाचण्या कशा केल्या जातात, हे समजून सांगितले.

तसेच ART व्यवस्थापन: अँटी-रेट्रो व्हायरल थेरपीच्या औषधांचे वितरण, रुग्णांकडून औषधांच्या नियमित सेवनावर (adherence) देखरेख आणि संधीसाधू संसर्गांचे (opportunistic infections) व्यवस्थापन याबाबत माहिती विद्यार्थ्यांना माहिती सांगण्यात आली. सदर भेटीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विकास व्ही. पाटील उपप्राचार्य डॉ.कल्पेश कुमार एस. वाघ यांचे मार्गदर्शन लाभले तर प्रा.गौरव पाटील यांनी भेट यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.

सदर कार्यक्रमाबद्दल किसान विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष व धुळे जिल्हापरिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. तुषार रंधे, सचिव निशांत रंधे, खजिनदार ताईसो आशाताई रंधे, बोराडीचे उपसरपंच राहुल रंधे, धुळे व नंदुरबार जिल्हा ग. स. बँकेचे चेअरमन शशांक रंधे, नगरसेवक रोहीत रंधे यांनी अभिनंदन केले.